नगर विकास विभागाच्या अधिपत्याखालील महानगरपालिका / नगरपालिका / प्रन्यास / महामंडळे वा प्राधिकरणांकडून विविध प्रयोजनांसाठी करण्यात येणाऱ्या स्थळपाहणी अहवालाबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१६/नवि-२५
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३०/०६/२०१५

**प्रस्तावना :-**

शासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, या विभागाच्या अधिपत्याखालील विविध महानगरपालिका/ नगरपालिका/ प्रन्यास/महामंडळे वा प्राधिकरणांकडून वा त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयांकडून विविध प्रयोजनांसाठी स्थळपाहणी केली जाते. तथापि अशा स्थळपाहणीचे अहवाल स्थळनिरिक्षणानंतर वरिष्ठ कार्यालयांना सादर होण्यामध्ये खूप दिरंगाई होत असते. परिणामी अशा स्थळनिरिक्षणावर अवलंबून असणा-या पुढील कार्यवाहीस वा निर्णय प्रक्रियेस विलंब होतो. याशिवाय स्थळनिरिक्षण अहवालाअभावी काही प्रमाणात प्रकरणे प्रलंबित असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे.

**शासन निर्णय :-**

यास्तव विभागाच्या अधिपत्याखालील महानगरपालिका/ नगरपालिका/ प्राधिकरणे/प्रन्यास/ महामंडळे वा त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयांकडून करण्यात येणाऱ्या स्थळनिरिक्षण कार्यपध्दतीमध्ये एकसमानता आणणे आवश्यक आहे. याकरीता अशा कार्यालयांनी केलेल्या स्थळनिरिक्षणानंतर त्याबाबतचे स्थळनिरिक्षण अहवाल संबंधितांना सादर करण्यासाठी ७२ तासांची कालमर्यादा निश्चित करण्यात येत असून या विहित मर्यादेत स्थळनिरिक्षण अहवाल सादर केले जातील याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्री. द. यादव)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१. आयुक्त, सर्व महानगरपालिका
२. संचालक,नगर परिषद शासन संचालनालय, वरळी.
३. महानगर आयुक्त, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण
४. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास,
५. मुख्यकार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण